बृहन्मुंबई महानगरपालिका
नगर अभियंता मध्यवर्ती कार्यालय
क्र.नअ/1808/आने-3 दि. 10/07/2020

## नियुक्ती आदेश

**कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)** या पदाकरिता सरळसेवा भरती प्रक्रियेद्वारे मा.महापालिका आयुक्त यांच्या दि. 09.09.2019 रोजीच्या मंजुरी क्र.एमजीसी/एफ/294 अन्वये तसेच दि.12.09.2019 अन्वये प्रसारित करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्तीकरिता मा.महानगरपालिका आयुक्त यांनी क्र. एमजीसी/एफ/294 दि.15.06.2020 अन्वये दिलेल्या मंजुरीनुसार खालील स्तंभ क्र.2 येथे नमूद उमेदवाराची हंगामी **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)** या पदावर वेतनश्रेणी रु.38600-122800 अधिक (अनुज्ञेय भत्ता व इतर अनुज्ञेय भत्ते) या वेतनश्रेणीत स्तंभ क्र. 3 येथे नमुद केलेल्या जात प्रवर्गातून स्तंभ क्र.5 येथे नमुद केलेल्या खात्यात खालील अटी व शर्तींसापेक्ष हंगामी नियुक्ती करण्यात येत आहे.

श्री. बळीराम निवृती क्षिरसागर यांनी दि.18.08.91 चे परिपत्रक क्र.सीए/एफजीआर/38 अन्वये भरावयाची (एक महिन्याच्या वेतनाएवढी) सुरक्षा अनामत रक्कम रु.55,500/- पावती / सॅप डॉक क्रमांक 1003868103 दि.02.07.2020 अन्वये महानगरपालिकेच्या कोषागारामध्ये भरणा केली आहे.

| अनु क्र | नवनियुक्त कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांचे नाव | कर्मचा-याचा जात प्रवर्ग | नियुक्तीचा जात प्रवर्ग | नियुक्तीचे खाते | नियुक्तीचा तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | श्री. बळीराम निवृत्ती क्षिरसागर | सा.व शै. | सा.व शै. | जल अभियंता | क.अभि.(स्था.)संवर्गातील उपलब्ध रिक्त पदी. |

| | |
|---|---|
| 1) | "सदर नियुक्ती मा.उच्च न्यायालयात दाखल याचिका (L) क्र.2816 – 2014 च्या तसेच इतर संबंधित न्यायालयीन याचिकांच्या अंतिम निर्णयासापेक्ष असेल." |
| 2) | वरिल नमूद कर्मचाऱ्यांची हंगामी **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)** पदावरील नियुक्ती त्यांना निवड यादीत सेवाजेष्ठ असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवाजेष्ठतेत बाधा न आणता असेल. |
| 3) | सदर नियुक्तीचा परिविक्षाधीन कालावधी नियुक्ती झाल्यापासून 3 वर्षाचा राहील व त्यांच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.सदर कालावधीत त्यांनी नैमितीक रजा वगळता कोणतीही इतर रजा घेतल्यास त्यांचा परिविक्षाधीन कालावधी तेवढ्या मुदतीने वाढेल. |
| 4) | सदर परिविक्षाधीन कालावधीत, महानगरपालिकेस सदर कर्मचाऱ्यांची **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)** पदाची सेवा कोणतेही कारण न देता संपुष्टात आणता येईल. तसेच, खालील नमूद कर्मचाऱ्यांस महानगरपालिकेतील **कनिष्ठ अभियंता(स्थापत्य)** पदाचा राजीनामा द्यावयाचा असेल तर त्यांनी महानगरपालिकेस किमान एक महिन्याची पूर्वसूचना देणे आवश्यक आहे. अन्यथा, त्यांना त्यांच्या शेवटच्या एक महिन्याच्या वेतनइतक्या रकमेचा भरणा महानगरपालिकेकडे करावा लागेल. |
| 5) | सदर कर्मचाऱ्याची नियुक्ती महानगरपालिका सेवा नियमावलीनुसार करण्यात आली असून कार्यालयीन कामकाजाची वेळ प्रशासनाच्या सोयीनुसार असेल.त्यांना सार्वजनिक सुट्टया आणि साप्ताहिक रजा तसेच त्यांना जेथे काम करण्यासाठी पाठविण्यात आले आहे.त्या खात्याला / विभागाला वेळोवळी दिल्या जाणाऱ्या |

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| | सवलती देण्यात येतील आणि पुढे असेही नमूद करण्यात येते की, त्यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रातील कोणत्याही ठिकाणी / विभाग कार्यालय /खात्यात काम करावे लागेल. |
| 6) | उपायुक्त (सा.प्र.) यांच्या दि.04.07.2008 च्या परिपत्रक क्र.साप्रवि/एफजीआर/10 अनुसार दि.05/05/2008 रोजी किंवा त्यानंतर महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना नविन परिभाषित अंशदाननिवृत्तीवेतन योजना लागू ठरेल. मात्र, सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही. |
| 7) | आपण पदवीधारक/उच्च पदवीधारक असुन स्वेच्छेने कनिष्ठ अभियंता पदावर नियुक्ती स्विकारीत आहात. भविष्यात आपणास दुय्यम अभियंता किंवा त्यावरील पदावर सेवाजेष्ठतेशिवाय इतर कोणत्याही पर्यायाने बढतीसाठी आपण पात्र ठरु शकत नाही किंवा कोठलाही विवाद/लवाद प्रशासन मान्य करणार नाही. |
| 8) | त्यांना मुंबई महानगरपालिका (सेवा) नियमावली 1989, मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणुक) नियम 1989 आणि शिस्त याबाबत महानगरपालिकेने तयार केलेले नियम व अटी/शर्ती यामध्ये वेळोवेळी होणा-या सुधारणांसह बंधनकारक असतील. |
| 9) | उमेदवाराने सादर केलेली प्रमाणपत्रे खोटी आढळल्यास त्यांना कोणतीही पूर्व सूचना न देता सेवा समाप्त करण्याचे अधिकार मा. महानगरपालिका आयुक्त यांना आहेत. |
| 10) | उपरोक्त उमेदवाराची नियुक्ती मागासवर्गीय आरक्षित पदावर करण्यात आली आहे. तथापि, उमेदवाराकडे नियुक्तीच्या वेळी जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याने परिपत्रक क्र.एमबीसी/7100 दि.31.01.2012 मधील शासन निर्णय क्र.बीसीसी/2011/प्र.क्र.1064/2011/16 बी दि.12.12.2011 नुसार मागासवर्गीय आरक्षित पदावर निवड झालेल्या संबंधीत उमेदवाराने नियुक्तीनंतर सहा महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.तसेच मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेल्या पदावर नियुक्ती झाली असल्यास जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधीन राहून त्यास तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल तथापि, नियुक्तीनंतर एक महिन्यांच्या आत उमेदवाराने संबंधीत पडताळणी समितीकडे दावा दाखल करून त्याबाबतची पोचपावती नियुक्ती प्राधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक आहे.'' सदर नियुक्ती, याचिका क्र.2136/2011 मध्ये दि.25.08.2011 रोजी न्यायालयीन आदेशाच्या विरोधात दाखल केलेल्या SLP मधील मान.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांच्या अधीन राहून करण्यात येत आहे.'' |

सदर कार्यालयीन आदेश दि.10.07.2020 पासून लागू आहे.

श्री. बळीराम निवृत्ती क्षिरसागर हे दि.10.07.2020 रोजी नगर अभियंता मध्यवर्ती कार्यालयात उपस्थित होते.

सही/-(10.07.2020)
नगर अभियंता

**प्रत:- श्री. बळीराम निवृत्ती क्षिरसागर , नवनियुक्त कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)**

**प्रशासकीय अधिकारी (4)**
**नगर अभियंता मध्यवर्ती कार्यालय**

PRINCIPAL
Dr. Vithalrao Vikhe Patil
College of Engineering
Ahmednagar

Scanned with CamScanner